# ‘महात्मा गांधीजींच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता’

**सहा. प्रा. भीमराव जोतिबा शिंदेए** प्रमुख, मराठी विभाग,कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज. (०२३२७२२४४०५)

- **प्रस्तावना :—**

मानवी जीवन सुखी, आनंदी होण्यासाठी खूप गोष्टींची आवश्यकता असते. मानवाच्या अन्न , वस्त्र, निवारा , शिक्षण , आरोग्य , ज्ञान , विज्ञान , संस्कार , नीती , मूल्ये , उत्पादन क्षमता , आर्थिक सुबत्ता, भावजीवन, भौतिकजीवन , आध्यात्मिक जीवन इ. अनेक लहान मोठया गरजा आहेत. अशा गरजांसाठी अनेक थोर लोकांनी फार मोठा त्याग मानवी जीवनासाठी केलेला आहे. समर्पित वृत्तीने स्वीकारलेल्या कार्याला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य, कला, इतिहास इ. अनेक शास्त्रे आपापल्या अभ्यास क्षेत्रातून योगदान देत असतात. त्याचा उपयोग मानवी जीवन सुखमय करण्यासाठी, प्रगत करण्यासाठी होत असतो. प्राचीनकाळापासून आजपर्यंत याची परंपरा अथवा अभ्यास मानव अनुभवत आला आहे. याचा आधार मानवी जीवनास मिळाला आहे. याप्रस्तुत शोधनिबंधात आपण महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार समजून घेणार आहोत. त्यांचे विचार, कल्पना आणि तत्त्वज्ञान यातून पुढे येणारा त्यांचा आर्थिक विचारा इथे महत्त्वाचा आहे

- **परिचय :—**

महात्मा गांधी या थोर विचारवंतास, नेतृत्वास, समाजसुधारकास, देशास स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या थोर नेतृत्वास , आंदोलकास , महामानवास, भारताच्या या सुपुत्रास कोणी ओळखत नाही अथवा त्यांचा अल्पसा परिचयही नाही अशी व्यक्ती सापडणे कठिणच. हे सारे विश्व त्यांच्याकडे आदराने पाहते. मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात राज्यातील पोरबंदर या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण राजकोट येथे झाले. पुढे त्यांनी इंग्लंडमध्ये जाऊन १८९१ मध्ये कायद्याची पदवी मिळवली. पण या क्षेत्रामध्ये ते फारसे रमले नाहीत. साधी राहणी— उच्च विचार — परोपकार — त्याग— अहिंसा — भगवद्गीताभ्यास,सामाजिक बांधिलकी, अन्याया विरोधात लढा, ज्ञानमय जीवन, विचार आणि कृतीचा समन्वय , इच्छाशक्ती — विचारशक्ती —आत्मिक शक्ती यांचा त्रिवेणी संगम , जबरदस्त आत्मविश्वास, निर्भयवृत्ती, सत्याग्रही, हीन — दीनांचा आधारवड, विश्वाला प्रेरणा देणारा महामानव, स्वधर्मप्रेमी, निश्चयी, मतिमान असं खूप — खूप वेगळं व्यक्तिमत्व, देशावर व विश्वावर आणि अखिल सृष्टिवर प्रेम करणारे थोर आस्तिक महात्मे म्हणजे महात्मा गांधी. देशासाठी आपले अखंड आयुष्य वेचणाऱ्या महात्मा यांच्या कार्याला प्रथम सुरुवात झाली ती दक्षिण आफ्रिकेतून. त्यांच्यातील सुप्त शक्तीची जाणीव त्यांना त्या काळी आफ्रिकेतच झाली. सत्याग्रहाचा प्रारंभ त्यांनी तिथेच केला. तेथील सामाजिक कार्यानेच ते प्रकाशझोतात आले. पुढे भारतात आल्यानंतर सन १९२० मध्ये ‘असहकार चळवळ’, सन १९३० मध्ये ‘मिठाचा सत्याग्रह’, सन १९४२ मध्ये ‘भारत छोडो आंदोलन’ म्हणजेच ‘चले जाव’ ची चळवळ यातून त्यांचे प्रचंड शक्तिशाली नेतृत्व साऱ्या विश्वाने पाहिले— अनुभवले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी जणू सिंहगर्जनाच केली होती.

महात्मा गांधी यांचे उपरोक्त स्वरूपाचे योगदान कमी — अधिक प्रमाणातसर्वश्रुत आहेच. आपणांस त्यांचे आर्थिक विचार अथवा त्यांचे आर्थिक तत्त्वज्ञान समजून घ्यायचे आहे. महात्मा गांधींनी अनेक नवनवीन तत्वे व कल्पना मांडल्या. त्यांच्या कल्पनांना केवळ राजकीय दृष्टीनेच नव्हे तर आर्थिक व सामाजिक दृष्टीने महत्त्व आहे. ‘ सर्वजण समान आहेत’ हे गांधीजींचे तत्त्वज्ञान त्यांच्या आर्थिक विचारांचा पाया समजला जाते.विविधांगी विचारांनी शोभणारं, सुगंध देणारं व मानवी जीवनास प्रगतीकडे वाटचाल करायला लावणारं अद्भुत रसायन, सुपरमॅन अथवा स्थितप्रज्ञ अथवा ‘रंग माझा वेगळा’ असं अद्भुत आणि गुढ, पूर्णतः न उकललेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी.

- **विषय विवेचन :**

‘ माणसाच्या अंतर्बाहय स्वभावाला, जीवनाला महत्त्व देणारे, माणसाच्या जीवनाला, सर्वांगाला फुलविणाऱ्या विचारांना त्यांनी खूप महत्त्व दिले आहे. महात्मा गांधीजींनी पैसा आणि भौतिक संपत्तीपेक्षा मानवी मूल्यांवर म्हणजेच विविध गुणांवर संस्कारांवर भर दिला आहे. मानवतावादी विचारसरणीची मांडणी त्यांनी केलेली आहे. फक्त व्यावहारिकता त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची नाही. प्रत्येकाने नैतिकता जोपासली पाहिजे, पैसा हा मानवापेक्षा अधिक महत्वाचा नसून, माणूस हा महत्वाचा आहे. त्याचे जीवन पैशाहून , संपत्तीहून अधिक मौल्यवान आहे, असे गांधीजींचे आकलन होते. पण तरीही अर्थव्यवस्था ही मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे याचे त्यांना पूर्णपणे भान होते. संपूर्ण मानवजातीचा विकास हा मानवी व नैतिक मुल्यांच्या जोपासनेवरच आधारलेला आहे. त्यामुळे प्रत्येकाचे आचरण शुध्द असले पाहिजे. अशा प्रकारे मानवी मूल्यांना गांधीजींनी महत्त्व देऊन अर्थशास्त्राशी नीतिशास्त्राचा संबंध प्रस्थापित केला आहे. ‘उत्तम व्यवहारे वेचावे धन’ म्हणजे आपण मिळवत असलेली संपत्ती योग्य मार्गाने मिळविली पाहिजे. ती मिळवित असताना कोणाला फसवून, लुबाडून, समोरच्या व्यक्तिचे नुकसान करून मिळवलेली नसावी. योग्य तोच मोबदला घ्यावा. असा संतांचाही विचार होता. संतहृदयाचा आर्थिक विचारवंत असे गांधीजींना संबोधल्यास अतिशयोक्ती ठरु नये.

गांधीजींच्या उपरोक्त तत्त्वाबरोबरच मानवजातीमधीलभेदभाव संपविण्यासाठी त्यांनी मांडलेली ‘ वर्ग समन्वयाची ’ कल्पना, तसेच ज्यामध्ये लोकांच्या, समाजाच्या विकासाला, कल्याणाला महत्व आहे अशी त्यांची ‘ सर्वोदय ’ ही कल्पना अथवा विचार अथवा सर्वांच्या, देशाच्या स्वावलंबनासाठी व ऐक्यासाठी त्यांनी मारलेली ‘स्वदेशीची हाक’, ‘स्वदेशीचा नारा’ अशा अनेक विचारांमधून मानवजातीच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब दिसून येते. सुख, समाधान, शांतता, सत्यनिष्ठता या मार्गांनी व्यक्ती व समाजाचा विकास, प्रगती साध्य होईल. महात्मा गांधीजींच्या मानवतावादी विचारांतून अशाप्रकारे मूल्यांना महत्व दिले गेलेले दिसते. आर्थिक विचारांची मांडणी करत असतांना ते कुठेही मानवतावादाला, सुसंस्कृत, सुहृदयी जीवन जगण्याला अंतर देत नाहीत.

महात्मा गांधी यांनी स्वतंत्र असे अर्थशास्त्रीय विचार मांडले नव्हते. अर्थशास्त्रावर आधारीत असे लेखनही त्यांचे नाही. पण त्यांनी जे काही विचारमंथन केले आहे , जे काही त्यांनी विविध विचार मांडलेले आहेत त्यातूनच त्यांचे अर्थशास्त्रीय विचार अथवा आर्थिक विचाराचे दर्शन आपणास घडू शकते. ग्रामस्वराज्य, ग्रामीण उद्योग, स्वदेशी विश्वस्ताची कल्पना, सहकारिता, ग्रामीण विकास, विकेंद्रीकरण इत्यादी कल्पनांमधून गांधीजींच्या आर्थिक विचारांचे विवेचन आपणास करता येईल. महात्मा गांधी अर्थशास्त्राचे विद्यार्थी अथवा अर्थतज्ञ नव्हते. पण त्यांच्या विचारांतून मानवी जीवनास आवश्यक असणाऱ्या गोष्टी सुटलेल्या नाहीत. त्यांनी घेतलेल्या वैचारीक भूमिकेतूनच वेगवेगळया विषयांवरील त्यांचे विचार आपण समजून घेऊ शकतो. तसेच त्यांच्या आर्थिक विचारांबाबत घडताना दिसते. त्यांनी मांडलेल्या विचारातच, त्यांच्यातत्वज्ञानातच त्यांचे आर्थिक विचार डोकावताना दिसतात.

साधी राहणी आणि उच्च विचार व आचार या गोष्टी माणसाला आनंददायी जीवनाच्या वाटेवर घेऊन जाऊ शकतात.गांधीजींच्या विचारांप्रमाणे समाजातील प्रत्येक व्यक्तीने साधे जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर सर्व प्रश्न आपोआप सुटतील. साधी राहणी व उच्च विचारसरणीचा पुरस्कार त्यांनी केला. व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये प्रामाणिकपणा, सचोटी, सुसंगती राखणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या गरजा कमीत कमी ठेवल्या पाहिजेत. इतरांना जे मिळते ते आपल्यालाही मिळावे, असा आग्रह करणे चुकीचे आहे. प्रत्येक व्यक्तीने संयमी जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खूप गोष्टींची अपेक्षा केल्याने जीवन अतृप्त व असमाधानी राहते. प्रत्येक देशवासीयाने, प्रत्येक भारतीयाने देशाची परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या गरजा कमी करायला शिकले पाहिजे. आनंदी, समाधानी व सुखी जीवनासाठी साध्या जीवनशैलीचा पुरस्कार गांधीजींनी केला. तसा संदेश स्वकृतीतून संपूर्ण मानवजातीला दिला.

गाधींजींना सारे जग ओळखते ते त्यांच्याकडील ‘अहिंसा’ या तत्त्वासाठी. गांधीजींच्या जीवनावर अहिंसा या तत्वाचा फार मोठा प्रभाव आहे. त्यांनी अहिंसा या तत्वाला खूप महत्त्व

दिले आहे. अहिंसा हे साधन आहे तर सत्य हे साध्य आहे असे ते मानायचे. 'अहिंसा' हे सत्यनिष्ठ मानवाचे कर्तव्य आहे. ''पृथ्वीतलावरील कोणत्याही वस्तुमानाला व प्राणीमात्राला विचाराने, शब्दाने, कृत्याने संभवणारी दुखापत टाळणे म्हणजे अहिंसा होय.'' अशी अहिंसेबद्दलची व्याख्या त्यांनी 'हरिजन' मधील लेखात केली आहे. गांधीजी अहिंसेला सर्वश्रेष्ठ बाब मानीत असत. अहिंसा ही अत्यंत प्रभावी शक्ती आहे. अहिंसा ही शौर्याची चरमसीमा आहे. महात्मा गांधींच्या मते खरी लोकशाही आणि वास्तव विकास हा फक्त अहिंसात्मक समाजामध्येच शक्य असतो. अहिंसेचा धर्म जर कशात असेल तर स्वत: शक्य तेवढी गैरसोय सोसून इतरांना कमाल सोय उपलब्ध करून देण्यात आहे. आपण स्वत: इतरांसाठी किती त्याग सोसू शकतो याचे प्रत्येकाने आत्मपरीक्षण करावे. अहिंसेची साधना करावी, अहिंसा हे तत्त्व आपल्या जीवनात अंगिकारावे व उच्चतम संस्कारी जीवन जगण्याचा प्रत्येक मानवाने प्रयत्न करावा. असा आदर्शवाद गांधीजींच्या विचारात प्रभावीपणे जाणवत राहतो. अशाप्रकारे काही महत्वाचे विचारधन , मानवी मूल्ये, साधेपणा, अहिंसा अशा विचारांतून त्यांनी 'विकासाची मूलभूत तत्त्वे' सांगितलेली दिसतात. महात्मा गांधीजींच्या विचारातील विकासाची कल्पना ही अतिशय व्यापक कल्पना मानली जाते. त्यांना संपूर्ण मानव जातीचा विकास अभिप्रेत होता. यामध्ये मानवाचा केवळ आर्थिक दृष्टिकोनातून विचार न होता सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक अशा चहू बाजूंनी विकास गांधीजींना अभिप्रेत आहे. संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानातून केल्याचे दिसते. महात्मा गांधीजींच्या विचारांना नैतिक व धार्मिक अधिष्ठान लाभलेले आहे. 'जगातील सर्वच चांगल्या तत्त्वांची मूळे त्यांना 'हिंदू' धर्मात अभ्यासायला मिळतात ' असे त्यांचे म्हणणे आहे. गांधींजींनी मानवी मूल्यांवर अधिक भर देऊन मानवजातीच्या संपूर्ण विकासाचे चित्र आपल्या विचारांतून रेखाटले आहे. साधेपणा, अहिंसा, मानवी मूल्ये, सत्यनिष्ठता, सत्याग्रह अशा तत्त्वांना अत्यंत महत्व दिले आहे. अशा तत्त्वांनाच गांधीजींची विकासाची तत्त्वे असे संबोधले जाते. अशा तत्त्वांची उकल उपरोक्त विवेचनांतून करण्याचा प्रयास इथे केलेला आहे. वरील मांडणीतून काही प्रमाणात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'खेडयाकडे चला' असा संदेश महात्मा गांधीजींनी दिला.भारत हा खेड्यांनी बनलेला देश आहे. भारतीय संस्कृती ही खेडेगावात आजही पाहायला मिळते. पण खेडयांचा विकास हा आजही गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे पूर्ण झालेला नाही. हे नाकारता येणार नाही. खरा भारत खेडयात पाहायला मिळतो. खेडयांचा विकास हा गांधीजींनी पायाभूत मानला आहे. त्यातूनच त्यांची ग्रामस्वराज्य ही कल्पना पुढे आली आहे. महात्मा गांधीजींनी स्वयंपूर्ण खेडयासाठी लोकांचा सहभाग सर्व पातळयांवर असणे आवश्यक आहे असे मानले आहे. त्यांनी रामराज्याची कल्पना मांडली. रामराज्य म्हणजे जिथेव्यक्तिस्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य मानले जाते. अशी विकेंद्रित लोकशाही व्यवस्था असलेले राज्य होय. अशा राज्यात उच्च — नीचता नसेल, गरीब — श्रीमंत, स्त्री — पुरुष, जात — पात, वंश, पंथ असा भेदभाव केला जात नसेल. अशा राज्यात कमी खर्चात प्रत्येकाला न्याय मिळेल, तसेच तेथे विचार व लेखन स्वातंत्र्य असेल, प्रत्येकजण कायद्यांचे काटेकोर पालन करेल, अशा राज्यात समृद्ध, सुखी व स्वयंपूर्ण खेडी असतील. अशा प्रकारची रामराज्याची म्हणजेच ग्रामस्वराज्याची कल्पना महात्मा गांधीजीनी मांडली. प्रत्येक खेडे स्वतंत्र, स्वयंपूर्ण व राजकीयदृष्टया स्वयंशासित असले पाहिजे. खेडयात स्वत:चे शासन असावे. प्रत्येक खेडयाने आपला कारभार स्वत:च करावा. मध्यवर्ती सरकारकडे कमीत कमी अधिकार असावेत असे त्यांचे मत होते. त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वोच्च महत्त्व दिले होते.

ग्रामस्वराज्याची संकल्पना साकारण्यासाठी, गावातील लोक शांतीपूर्ण व गौरवशाली जीवन जगत असतील, प्रत्येक गावात पंचायत असेल. खेडयांमधून जिल्हा मंडळे निवडली जातील. जिल्हा मंडळींनी प्रांतिक मंडळ व प्रांतिक मंडळींनी मध्यवर्ती मंडळे निवडावीत. अशा प्रकारची शासन व्यवस्था असावी असे गांधीजींनी सुचविले होते. अशा शासन व्यवस्थेत जास्तीत जास्त अधिकार खेडेगावाकडे असावेत. असे मत महात्मा गांधीजींचे होते. स्वयंपूर्ण स्वयंशासित खेडेगावांचा संघ म्हणजे ग्रामस्वराज्य अशी महात्मा गांधीजींची कल्पना होती. आदर्श समाज वर्तुळाकार राहील. त्याच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल. गावातील कायदे, न्याय,

शासनविषयक सत्ता ग्रामपंचायतीकडे राहील. राजकीय शक्ती हे साध्य नसून ते एक साधन आहे, असे गांधीजींचे मत होते. खेडयातील लोकांनी एकमेकांशी सहकार्याने वागून सर्वांच्या सर्व गरजांची पूर्तता करण्यासाठी सक्रीय असले पाहिजे अशी व्यवस्था निर्माण झाल्यावर कोणीही कोणाचे शोषण करणार नाही व अशा शोषणमुक्त समाजातून खरेस्वातंत्र्य व खरी समता उदयास येईल, असा गांधीजींना विश्वास होता.

औद्योगिक क्रांतीमुळे उद्योगधंद्याची प्रचंड वाढ होत गेली. त्यातून शहरीकरण वाढत गेले. खेडयातील परंपरागत लघु कुटीरोद्योग लोप पावत गेले. संपत्तीचे केंद्रीकरण होत गेले. ग्रामीण भागात गरिबी व बेरोजगारी वाढत गेली. त्यामुळे खेडयातील लोकांचे स्वातंत्र्य नष्ट होण्याची वेळ आली. खेडयांची स्वयंपूर्णता संपुष्टात येऊ लागली. या पार्वभूमीवर गांधीजींनी आपली ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडली आहे. खेडे गावात ग्रामोद्योग, लघुदयोग स्थापन व्हावेत. गावातील लोकांना रोजगारासाठी इतरत्र जावे लागू नये, तसेच प्रत्येक खेडे राजकीय, सामाजिक, आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण, विकसित आणि स्वतंत्र असावे अशी गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची कल्पना होती. म्हणून तर त्यांनी खेडयाकडे चला असा संदेश दिला होता.

ग्रामविकासाची संकल्पना गांधीजींना कशाप्रकारे अभिप्रेत होती, हे समजावून घेणे इथे महत्त्वाचे ठरेल. स्वयंपूर्ण ग्रामविकासासाठी प्रत्येक खेडयाने ज्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे, अशा अटी गांधीजींनी पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत. रचनात्मक दृष्टीने प्रत्ये खेडयात ठराविक व्यवस्था असली पाहिजे. खेडयांची रचना नीटनेटकी असावी. अशा खेडयात फळझाडेअसली पाहिजेत. त्या ठिकाणी धर्मशाळा आणि दवाखाना असला पाहिजे. अन्नधान्य आणि कपडालत्ता या बाबतीत असे खेडे स्वयंपूर्ण असले पहिजे. खेडयातील रस्ते आणि गल्ल्या कमालीच्या स्वच्छ असल्या पाहिजेत. जेणेकरुन अनवाणी चालणाऱ्यांनाही त्रास होता कामा नये. खेड्यातील मंदिर, मस्जिद ही ठिकाणे स्वच्छ असली पाहिजेत. सांडपाण्याची व्यवस्था, संरक्षण यंत्रणा, पाणीपुरवठा, करमणुकीची सोय, गोठे,मोठे मैदान, नगदी पिकांचे उत्पादन, मूलभूत शिक्षण सक्तीचे असणे, कारभार सहकारी पद्धतीने, पाच पंचांकडून शासन, पंचायतीला न्यायदानाचा व कायदे बनविण्याचा अधिकार, खेडयाच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वांवर, जातिव्यवस्था व अस्पृश्यतेला नकार असणे इ.गोष्टींना महत्व दिले. प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण, आवश्यक. ग्रामविकासावर भर, शेतीची भरभराट, उद्योगांचे विकेंद्रीकरण, लघुद्योग व सहकारी संस्थांचा विकास आवश्यक. ग्रामविकासातूनच देशाचा विकास, खेडयातील शिक्षण, आहार, दारिद्रय, आरोग्य इ. प्रश्न सोडविणे, खादी, हातसडीचे तांदूळ, हातांनी दळणे, साबण उत्पादन, पेपर उत्पादन, आगपेटी, पादत्राण, तेल घाणा इ. उद्योगांना प्राधान्य दिल्यास विकास शक्य. प्राचीन काळी भारतातील खेडी ही आर्थिक व सामाजिक दृष्टीने स्वयंपूर्ण होती. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन आणि ‘ चरखा ’ यास महत्त्व देऊन, उपरोक्त केलेल्या मांडणीच्या आधारे ग्रामविकासाची संकल्पना साकार होऊ शकते. असे महात्मा गांधीजींचे ग्रामविकासाचे प्रयत्न झालेले दिसतात.

त्याचप्रमाणे विकेंद्रीकरणाच्या बाबतीत प्रामुख्याने उत्पादन व्यवस्थेस महत्त्व दिले. ‘विकेंद्रकीरण म्हणजे वेगवेगळया ठिकाणी लहान प्रमाणावरील उत्पादन व लोकांच्या घरांमध्ये केले जाणारे उत्पादन.’ उत्पादनाचे केंद्रीकरण टाळणे, विषमता टाळणे, आर्थिक व राजकीय प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून हे करणे. बेरोजगारी निर्माण होऊ नये, अहिंसावादी राज्य निर्माण होण्यासाठी विकेंद्रीकरणाची आवश्यकता त्यांना वाटे. उत्पादनाचे समन्यायी वाटप होण्यास मदत व संपत्तीच्या केंद्रीकरणाला लगाम बसेल असे त्यांचे मत होते. भारत देशात मानवी साधनसामग्री विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने उत्पादनासाठी श्रमप्रधान तंत्रावर भर देणे, कुटीर व ग्रामोद्योगांमुळे रोजगार वाढविणे, स्वस्तात वस्तूंचे उत्पादन, लोकांच्या उत्पन्नात वाढ, दारिद्रय व बेरोजगारीला लगाम यातून खेडी आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होतील. असा महात्मा गांधीजींना विश्वास होता.

**समारोप :—**

अशाप्रकारे महात्मा गांधीजींनी उपरोक्त केलेल्या मांडणीसमहत्त्व दिले आहे. त्यांनी मांडलेल्या उपरोक्त विचारांतून त्यांची विकासाची कल्पना स्पष्ट होते. यातून फक्त आर्थिक विकासाचा विचार पुढे न येता सर्वांगीण विकासाचा विचार पुढे येतो. सामाजिक, राजकीय,

सांस्कृतिक अशा चहू बाजूंनी होणारा विकास गांधीजींना अभिप्रेत आहे. त्यांची विकासाची कल्पना गांधीजींना ही खूप व्यापक आहे हे इथे स्पष्ट होताना दिसते. संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार त्यांनी आपल्या विचारांतून, तत्त्वज्ञानातून केलेला दिसतो. उपरोक्त मांडणीतून त्यांचे आर्थिक विचार, त्यांची विकासाची कल्पना, सर्वांगीण विकासावर भर, साधी राहणी, उच्च आचार – विचार, स्वातंत्र्यासाठीचे प्रयत्न, मानवाच्या अंतर्बाहय घडणीला महत्त्व, भौतिकतेबरोबर नैतिकता, मानवतावाद, मानवी मूल्ये, अहिंसा, साधेपणा, 'खेडयांकडे चला' ग्रामस्वराज्य, ग्रामविकास, विकेंद्रीकरण इत्यादी गोष्टींकडे ते कसे पाहतात, मानवजातीच्या सर्वांगीण उन्नतीकडे कसे पाहतात याचा प्रत्यय येतो. त्यातूनच त्यांची कल्पना, तत्त्वे, तत्त्वज्ञान, आर्थिक विचार, त्यांची विचारसरणी इत्यादी गोष्टी समजावून घेता येतात.

**निष्कर्ष :**

संपूर्ण मानवजातीचा, सर्वांगीण कल्याणाचा, सहिष्णूवादी व सहृदयी, कारुण्ययुक्त विचार महात्मा गांधी यांनी मांडला आहे. यांचा पिंडच मानवतावादाचा आहे. तरीपण महात्मा गांधीजींची संपूर्ण विचारसरणी ही आदर्शवादी विचारसरणी मानली जाते. सत्य, अहिंसा, साधेपणा, त्याग हा मूलमंत्र त्यांनी जगाला दिला. दारिद्रय, बेकारी, विषमता, यासारख्या विश्वव्यापी समस्या दूर करून, सर्वांचे कल्याण साध्य करण्याचा मार्ग त्यांनी शोधला होता. गांधीजींनी केवळ भारतातीलच नव्हे तर संपूर्ण विश्वातील आर्थिक, सामाजिक आणि आणि राजकीय कार्यांना एक नवी दिशा दिली. मानवी स्वभावात आमूलाग्र बदल घडवून आणण्यावर गांधीजींनी आपल्या विचारसरणीत भर दिलेला दिसतो. गांधीजींनी मांडलेल्या अनेक कल्पनांमधील ग्रामस्वराज्य, ग्रामविकास, विश्वस्त तसेच सर्वोदय यांसारख्या कल्पना मानवी कल्याणात भर टाकणाऱ्या आहेत. तसेच आर्थिक, सामाजिक समता निर्माण करणाऱ्या आहेत. एकूणच महात्मा गांधीजींच्या विचारात समग्र मानवजातीचे कल्याण आणि मानवाचा सर्वांगीण विकास या बाबी सामावलेल्या आहेत. व्यावहारीक, भौतिक, नैतिक, पारंपरिक, सांस्कृतिक, राजकीय, तात्विक, मानसशास्त्रीय, आध्यात्मिक, आर्थिक, समाजशास्त्रीय इत्यादी अनेक विचारधारांच्या समन्वयातून उदयाला आलेले व्यक्तिमत्व, उदयाला आलेल्या गांधीवादाला अजुनही, पुढेही अनेक वैचारीक दृष्टिकोन लाभतील असे वाटते. प्रत्येक क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात गांधीवाद यापुढील काळातही आपले योगदान देताना दिसेल असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१) मो. क. गांधी, 'सत्याचे प्रयोग' मराठी अनुवाद – सी . पु . पटवर्धन ,
२) काटे के. बी., ' अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास '
३) ठक्कर के. एच.'आर्थिक कल्पनांचा विकास'
४) कुलकर्णी श्री. प्र. 'आर्थिक विचारगाथा '
५) गोखले आर. एम, 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास'
६) डॉ. अनिलकुमार वावरे, प्रा. संजय धोंडे, डॉ. अनिल सत्रे, 'आर्थिक विचारांचा इतिहास'
७) अंबरीश मिश्र, 'गंगेमध्ये गगन वितळले'
८) संपा. प्रा. जे.एफ. पाटील, 'आर्थिक विचारांचा इतिहास'
९) अरुण सारथी, 'शोध महात्मा गांधींचा'
१०) संपा. वि.ग. कानिटकर, 'धर्म : महात्मा गांधींचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा'